मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड शहरासाठी हाय कॅपेसिटी मास ट्रान्सिट रुट आणि ई-आरटीएस प्रकल्पाला गती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात उच्चस्तरीय बैठक संपन्न; प्रायोगिक प्रकल्पाच्या तातडीने अंमलबजावणीच्या सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम (ई-आरटीएस) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक प्रशासकीय आणि तांत्रिक कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात महापौर रवी लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आणि सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्या उपस्थितीत संयुक्त आढावा बैठक संपन्न झाली.



मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत पिंपरी चिंचवड शहरासाठी ई-आरटीएस आणि हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रूट (एचसीएमटीआर) प्रकल्पाला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या स्तरावर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भातील पुढील कार्यवाही, आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, तांत्रिक नियोजन तसेच प्रकल्पाच्या कालबद्ध अंमलबजावणीबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीमध्ये ई-आरटीएस प्रकल्पाच्या प्रायोगिक टप्प्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक विभागीय समन्वय वाढविणे, तांत्रिक बाबींची पूर्तता करणे, विविध यंत्रणांशी समन्वय साधणे आणि नियोजित कालावधीत प्रकल्प सुरू करण्यासाठी आवश्यक सर्व कार्यवाही गतीने पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ई-आरटीएस ही अत्याधुनिक, पूर्णतः इलेक्ट्रिक आणि उच्च क्षमतेची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असून, शहरातील मेट्रो, बीआरटी, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी प्रभावी जोडणी निर्माण करण्यास ती महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास, प्रदूषणात घट होण्यास, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढण्यास तसेच नागरिकांना सुरक्षित, जलद आणि आधुनिक प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून ई-आरटीएस प्रकल्पाला अपेक्षित गती देण्यासाठी महानगरपालिका सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही पार पाडण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

# मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ई-आरटीएस प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती

## महापौर, आयुक्त व पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक संपन्न; प्रशासकीय कार्यवाही तातडीने सुरू करण्याचा निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम (ई-आरटीएस) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक प्रशासकीय आणि तांत्रिक कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात महापौर रवी लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आणि सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्या उपस्थितीत संयुक्त आढावा बैठक संपन्न झाली.



मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत पिंपरी चिंचवड शहरासाठी ई-आरटीएस आणि हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रूट (एचसीएमटीआर) प्रकल्पाला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या स्तरावर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भातील पुढील कार्यवाही, आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, तांत्रिक नियोजन तसेच प्रकल्पाच्या कालबद्ध अंमलबजावणीबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीमध्ये ई-आरटीएस प्रकल्पाच्या प्रायोगिक टप्प्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक विभागीय समन्वय वाढविणे, तांत्रिक बाबींची पूर्तता करणे, विविध यंत्रणांशी समन्वय साधणे आणि नियोजित कालावधीत प्रकल्प सुरू करण्यासाठी आवश्यक सर्व कार्यवाही गतीने पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ई-आरटीएस ही अत्याधुनिक, पूर्णतः इलेक्ट्रिक आणि उच्च क्षमतेची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असून, शहरातील मेट्रो, बीआरटी, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी प्रभावी जोडणी निर्माण करण्यास ती महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास, प्रदूषणात घट होण्यास, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढण्यास तसेच नागरिकांना सुरक्षित, जलद आणि आधुनिक प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून ई-आरटीएस प्रकल्पाला अपेक्षित गती देण्यासाठी महानगरपालिका सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही पार पाडण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

# भक्ती-शक्ती, वाकड, नाशिक फाटा ते चाकण मेट्रो मार्गाला गती मिळणार : आमदार शंकर जगताप

## पुणे मेट्रो टप्पा 2 ; आमदार जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश, प्रकल्पासाठी 12 हजार 937 कोटी रुपये खर्च अपेक्षित

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे मेट्रो टप्पा 2 अंतर्गत पिंपरी-चिंचवड शहरासह चाकण औद्योगिक पट्ट्यातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या भक्ती-शक्ती-वाकड-नाशिक फाटा-चाकण मेट्रो मार्गाला गती मिळाली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून, विधिमंडळ, नगरविकास विभागाकडे या मार्गाचा प्रश्न उपस्थित करून सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालाला तातडीने मंजुरी देण्याची आग्रही मागणी केली होती. त्याप्रमाणे सुधारित अहवाल सोमवारी सादर करण्यात आला.या सुधारित अहवालानुसार हा संपूर्ण मार्ग ४७.२१५ किलोमीटर लांबीचा, पूर्णपणे उन्नत स्वरूपाचा आणि ३४ स्थानकांचा प्रस्तावित आहे. प्रकल्पासाठी सुमारे १२ हजार ९३७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या मार्गामुळे निगडी, रावेत, पुनावळे, ताथवडे, वाकड, पिंपळे सौदागर, नाशिक फाटा, भोसरी, मोशी आणि चाकण हे निवासी, व्यावसायिक व औद्योगिक परिसर थेट मेट्रोने जोडले जाणार आहेत.

फुगेवाडी येथील महामेट्रो कार्यालयात सोमवारी, २७ जुलै २०२६ रोजी, प्रस्तावित निगडी ते चाकण मेट्रो मार्गाच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालाचे लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांसमोर सादरीकरण करण्यात आले.महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी प्रस्तावित मार्गाचे संरेखन, स्थानके आणि प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेची माहिती दिली. बैठकीला पिंपरी-चिंचवड शहराचे महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, तसेच पिंपरी-चिंचवड महापालिका अतिरिक्त आयुक्त सौ. तृप्ती सांडभोर UMTCचे सल्लागार रजनीश पोडवळ यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप यांनी सांगितले, महामेट्रोने सुधारित डीपीआर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे सादर केला होता. आता या अहवालाचे पदाधिकाऱ्यांसमोर सादरीकरण झाल्याने प्रकल्पाच्या पुढील मंजुरी प्रक्रियेला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. उपलब्ध प्रकाशित माहितीनुसार हा संपूर्ण मार्ग ४७.२१५ किलोमीटर लांबीचा, पूर्णपणे उन्नत स्वरूपाचा आणि ३४ स्थानकांचा प्रस्तावित आहे. प्रकल्पासाठी सुमारे १२ हजार ९३७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. आमदार शंकर जगताप यांनी राज्य शासन, महामेट्रो आणि महापालिका प्रशासनाकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाच्या प्रशासकीय प्रक्रियेला गती मिळत असून, सुधारित डीपीआरच्या सादरीकरणामुळे प्रकल्पाला आवश्यक मंजुरी मिळण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे



### नागरिकांना होणारे फायदे

» निगडी ते चाकण प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ होणार. वाकड, नाशिक फाटा, भोसरी, मोशी आणि चाकण परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार. चाकण औद्योगिक क्षेत्रातील कामगार आणि कर्मचाऱ्यांना सक्षम सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होणार. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दैनंदिन प्रवाशांना सुरक्षित व विश्वासार्ह प्रवासाची सुविधा मिळणार. पिंपरी-चिंचवडमधील वेगाने विकसित होणाऱ्या परिसरांना थेट मेट्रो कनेक्टिव्हिटी मिळणार.खासगी वाहनांचा वापर, इंधनाचा खर्च आणि वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी होण्यास मदत होणार. मार्गालगतच्या निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक परिसरांच्या विकासाला चालना मिळणार..

> "पवना नदीचे प्रदूषण ही आपल्या सर्वांसाठी चिंतेची बाब आहे. आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शहराचा पर्यावरण समतोल राखण्यासाठी कटिबद्ध आहोत. नदीपात्रात कचरा टाकणाऱ्यांवर आणि बेकायदेशीरपणे सांडपाणी सोडणाऱ्यांवर आता केवळ दंड करून थांबणार नाही, तर त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश मी प्रशासनाला दिले आहेत. प्रशासनाकडून नदीपात्र स्वच्छतेची विशेष मोहीम तातडीने राबवण्यात येईल."
>
> - शंकर जगताप,आमदार,
> चिंचवड विधानसभा मतदारसंघ .

### विधिमंडळात शंकर जगताप यांनी उठवला होता आवाज

» पिंपरी-चिंचवडमधील वाढते नागरीकरण, आयटी क्षेत्र, औद्योगिक आस्थापना आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेऊन या भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे आवश्यक आहे, अशी भूमिका आमदार शंकर जगताप यांनी सातत्याने मांडली आहे. डिसेंबर २०२५ मध्ये विधिमंडळातील पुरवणी मागण्यांद्वारे त्यांनी निगडी ते चाकण व्हाया वाकड मेट्रो मार्गाच्या प्रलंबित सुधारित डीपीआरचा मुद्दा उपस्थित केला होता. डीपीआरला तातडीने मंजुरी देऊन प्रकल्प पुढे न्यावा आणि पिंपरी-चिंचवड शहराची वाहतूक व्यवस्था अधिक वेगवान व सक्षम करावी, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली होती. दरम्यान नगरविकास विभाग राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी देखील १९ जून २०२६ रोजी पत्राद्वारे सुधारित डीपीआरमध्ये आपण सुचविलेल्या मागण्यांचा समावेश करत असल्याचे सांगितले होते.

### प्रस्तावित ३४ मेट्रो स्थानके

» भक्ती-शक्ती, ट्रान्सपोर्ट नगर, गणेश नगर, आदर्श नगर, मुकाई चौक, रावेत, पुनावळे गाव, पुनावळे, ताथवडे गाव, ताथवडे, भूमकर चौक, भुजबळ चौक, वाकड, विशाल नगर कॉर्नर, कोकणे चौक, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा, संत तुकाराम नगर, वल्लभ नगर, गवळी माथा चौक, सेंच्युरी एन्का कॉर्नर, लांडेवाडी, भोसरी गाव, भोसरी सेक्टर-१, गोडाऊन चौक, PIECC, भारत माता मोशी, चिंबळी फाटा, बारगे वस्ती, कुरुळी, आळंदी फाटा, नाणेकरवाडी आणि चाकण.

# लोणावळ्यात धोकादायक वर्षाविहार; भुशी धरणाच्या सांडव्यावर जीव धोक्यात घालून पर्यटकांचा आनंद

## मुसळधार पावसात भुशी धरणाचा प्रवाह वेगवान; पुराचा धोका असतानाही पर्यटकांची गर्दी, सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरामध्ये मागील आठवडाभरापासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे भुशी धरणाच्या सांडव्यावरून अतिशय वेगाने पाणी वाहत आहे. असे असताना धरणाच्या पायऱ्यांवर बसून पर्यटक जीवघेणा वर्षाविहार करत असल्याचे चित्र शनिवार व रविवारी पाहायला मिळाले. पाण्याच्या प्रवाहात बसून हे पर्यटक भिजण्याचा आनंद घेत होते.\



लोणावळ्यात जोरदार पाऊस सुरू असून, शहरावर पुराचे संकट आहे. एकीकडे स्थानिकांना या पावसामुळे झोप लागत नसताना दुसरीकडे पर्यटक मात्र हजारोंच्या संख्येने लोणावळा शहरात दाखल होत या डोंगर दऱ्यांमधून कोसळणारे धबधबे, धरणाच्या सांडव्यावरून व पायऱ्यांवरून वाहणारे पाणी यामध्ये बसून कोसळणाऱ्या पावसात भिजण्याचा आनंद घेत आहेत.

लोणावळा शहर हे पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेले ठिकाण असल्यामुळे या ठिकाणी दर शनिवार व रविवारी वर्षाविहाराचा आनंद घेण्यासाठी तसेच, धबधबे व धरणे या परिसरात फिरण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात.

एखादी दुर्दैवी घटना घडल्यानंतर त्याचा दीर्घकालीन परिणाम हा त्या परिसरातील पर्यटनस्थळांवर व तेथे व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यवसायांवर होत असतो. याचादेखील विचार पर्यटकांनी धोकादायक पर्यटन करताना करणे गरजेचे आहे.

# पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेचे मोठे पाऊल !

**शहरातील विविध भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने रखडलेल्या रस्त्यांच्या मिसिंग लिंक जोडण्याचे काम पुन्हा सुरू केले जाणार आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

प्रवाशांशी संवाद सोपा, सुलभ आणि आदराचा व्हावा यासाठी पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) बिगरमराठी रिक्षाचालकांसाठी मराठी भाषेचे विशेष प्रशिक्षण मोहीम सुरू सुरू केली आहे. आतापर्यंत ३० पैकी २६ चालक यात उत्तीर्ण झाले असून, शासनाच्या नियमांनुसार हे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी १५ ऑगस्ट २०२६ ही अंतिम मुदत आहे. १६ ऑगस्टपासून परिवहन विभागातर्फे कडक तपासणी मोहीम राबवली जाणार असून,

ज्यांच्याकडे अधिकृत प्रमाणपत्र नसेल, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. वेळप्रसंगी त्यांचे परवाने निलंबित होतील. मोहिमेला गती देण्यासाठी आरटीओने शहरातील प्रमुख रिक्षा संघटनांची तातडीची बैठक बोलावून सर्व चालकांना यात सहभागी होण्याचे आवाहन केले. आपापल्या भागातील सर्व बिगरमराठी रिक्षाचालकांना प्रशिक्षणात तातडीने सामील करून घ्यावे, असे निर्देश आरटीओने दिले आहेत.

बिगरमराठी रिक्षाचालकांची कामाची वेळ आणि रोजीरोटी लक्षात घेऊन आरटीओ ने प्रशिक्षणाचे स्वरूप अत्यंत सोपे आणि सुटसुटीत ठेवले आहे. पुणे आरटीओ कार्यालयात कार्यालयीन वेळेत दररोज एक तासाचे विशेष सत्र घेतले जाते. या सत्रात चालकांना प्रवाशांशी संवाद कसा साधावा, पत्ता कसा विचारावा, भाड्याचे पैशांचे व्यवहार कसे करावेत आणि ग्राहकांशी नम्रतेने कसे बोलावे, याचे धडे दिले जात आहेत.

प्रत्यक्ष वर्गाव्यतिरिक्त चालकांना घरी सराव करता यावा, यासाठी आरटीओकडून एक मोफत ई-पुस्तिकाही दिली आहे. प्रशिक्षणासाठी १५ ऑगस्टपर्यंतची मुदत दिली असून, १६ ऑगस्टपासून आरटीओ विशेष मोहीम राबवणार आहे. बिगरमराठी रिक्षाचालकाकडे मराठी भाषा संवाद पाठ्यक्रमाचे अधिकृत प्रमाणपत्र नसल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल, असे आरटीओ प्रशासनाने सांगितले.



### १२ मिसिंग लिंक पूर्ण करण्यावर भर

**» महापालिकेने २०२६-२७ या वर्षात शहरातील १२ महत्त्वाच्या मिसिंग लिंक पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या कामांमुळे शहरातील प्रमुख मार्ग अधिक सलग होतील आणि अनेक भागांतील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. आवश्यक ठिकाणी भूसंपादनाची प्रक्रिया राबवली जाणार असून पथ विभागाला कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या लिंक पूर्ण झाल्यानंतर सुमारे ६० किलोमीटर लांबीचे रस्ते प्रभावीपणे वापरात येतील, असा महापालिकेचा दावा आहे. त्यामुळे नागरिकांचा प्रवास अधिक जलद आणि सोयीचा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे..**

### 'मिसिंग लिंक' म्हणजे काय?

**» शहरातील दोन महत्त्वाचे रस्ते किंवा मार्ग जोडणारा, पण विविध कारणांमुळे अपूर्ण राहिलेला रस्त्याचा छोटा तुकडा म्हणजे 'मिसिंग लिंक'. अशा अपूर्ण जोडण्या पूर्ण झाल्यास वाहनांना मोठा वळसा घालावा लागत नाही, प्रवासाचा वेळ कमी होतो आणि वाहतूक कोंडीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळते. पुणे महापालिकेने शहरात सुमारे ७०० मिसिंग लिंक ओळखल्या असून त्यापैकी वाहतुकीवर सर्वाधिक परिणाम करणाऱ्या ३३ लिंकना प्राधान्य दिले आहे. यंदा त्यापैकी १२ मिसिंग लिंक पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असून यासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आली आहे.**

### वाहतूक कोंडीवर दीर्घकालीन उपाय

**» पुण्यातील वाढती लोकसंख्या आणि वाहनसंख्या लक्षात घेता मिसिंग लिंक प्रकल्पाला वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचा उपाय मानले जात आहे. अनेक भागांमध्ये अपूर्ण रस्त्यांमुळे नागरिकांना लांबचा वळसा घालावा लागतो, त्यामुळे इंधनाचा अपव्यय आणि वेळेची नासाडी होते. या लिंक पूर्ण झाल्यास पर्यायी मार्ग उपलब्ध होतील, मुख्य रस्त्यांवरील ताण कमी होईल आणि आपत्कालीन सेवांनाही जलद मार्ग मिळेल. शहराच्या विकास आराखड्याशी सुसंगतपणे ही कामे पूर्ण झाल्यास भविष्यातील वाहतूक नियोजनालाही मोठी मदत होणार आहे.**

---

# शहरात डेंग्युच्या रुग्णसंख्येत मोठी वाढ ; पांढरपेशा कोथरूड, कर्वेनगर ठरतोय हॉटस्पॉट ..

**एक जानेवारी ते 15 जुलै 2026 या कालावधीत शहरात 473 संशयित डेंग्यूरुग्णांची नोंद झाली असून, त्यापैकी 175 रुग्ण जूनमध्ये, तर जुलैच्या पहिल्या पंधरवड्यात 125 रुग्ण आढळले आहेत.**

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाने जोर धरताच शहरात डेंग्यूचाही प्रादुर्भाव वेगाने वाढू लागल्याचे महापालिकेच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. अवघ्या दीड महिन्यांत ३०० संशयित डेंग्यूचे रुग्ण आढळले आहेत. एक जानेवारी ते १५ जुलै २०२६ या कालावधीत शहरात ४७३ संशयित डेंग्यूरुग्णांची नोंद झाली असून, त्यापैकी १७५ रुग्ण जूनमध्ये, तर जुलैच्या पहिल्या पंधरवड्यात १२५ रुग्ण आढळले आहेत. वारजे, कर्वेनगर, कोथरूड या भागात सर्वाधिक डेंग्यूरुग्णांची संख्या आहे.

डेंग्यूरुग्णांच्या महिनानिहाय आकडेवारीवर नजर टाकल्यास जानेवारीत २५, फेब्रुवारीत २३, मार्चमध्ये २६, एप्रिलमध्ये ४१ आणि मे महिन्यात डेंग्यूचे ५८ संशयित रुग्ण आढळले. मात्र, जूनमध्ये ही संख्या थेट १७५ वर पोहोचली. विशेष म्हणजे जुलै महिन्याच्या केवळ १५ दिवसांत १२५ संशयित रुग्णांची भर पडली आहे. हा वाढीचा वेग कायम राहिल्यास पुढील काही आठवड्यांत डेंग्यूचा प्रादुर्भाव आणखी वाढण्याची शक्यता आरोग्य विभागाकडून व्यक्त केली जात आहे.

प्रभागनिहाय आकडेवारीत वारजे-कार्वेनगर (४६) हा भाग संशयित रुग्णांसह आघाडीवर आहे. त्या पाठोपाठ कोथरूड (४५), नगर रोड-वडगावशेरी (४४), औंध-बाणेर (४३) आणि धनकवडी-सहकारनगर (४२) या भागांमध्येही रुग्णसंख्या चिंताजनक आहे. कोंढवा-येवलेवाडी (३२), कसबा-विश्रामबागवाडा (३०) आणि येरवडा-कळस-धानोरी (२८) या भागांतही डेंग्यूचा प्रभाव दिसत आहे. तुलनेने केशवनगर (८) आणि बिबवेवाडी (११) येथे संशयित रुग्णांची संख्या कमी आहे.

साचणाऱ्या पाण्यामुळे डेंग्यूचा धोका पावसामुळे विविध ठिकाणी साचणारे पाणी, त्यातून होणारी डासांची पैदास आणि बदलते हवामान यामुळे डेंग्यूचा धोका अधिक वाढत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. घराच्या तसेच परिसराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देणे, पाणी साचू न देणे, डासांपासून संरक्षण करणारे उपाय करणे आणि ताप, अंगदुखी, डोळ्यांच्या मागे वेदना किंवा तीव्र अशक्तपणा यांसारखी लक्षणे आढळल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.



### डेंग्यूची लक्षणे ओळखा

**» डेंग्यू हा डासांमार्फत पसरणारा विषाणूजन्य आजार असून सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. अचानक तीव्र ताप येणे, डोकेदुखी, डोळ्यांच्या मागे वेदना, अंगदुखी, सांधेदुखी, अशक्तपणा, मळमळ किंवा त्वचेवर लाल पुरळ दिसणे ही डेंग्यूची प्रमुख लक्षणे आहेत. काही रुग्णांमध्ये प्लेटलेट्स कमी होण्याची शक्यता असते. अशी लक्षणे आढळल्यास स्वतः औषधे न घेता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. वेळेत निदान आणि उपचार झाल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येते.**

# ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणार; 4 ऑगस्टची मतदार यादी स्थगित

## राज्य निवडणूक आयोगाकडून 4 ऑगस्ट रोजी होणारी अंतिम मतदार यादी प्रसिद्धी स्थगित; मयत, दुबार व बोगस नावे वगळण्यासाठी निर्णय.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात मतदार यादी सखोल पुनरीक्षण कार्यक्रम म्हणजेच एसआयआर मोहीम सुरू असल्याने राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी प्रसिद्ध होणारी अंतिम मतदार यादी येत्या ४ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यास स्थगिती दिली आहे. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी एसआयआर मोहिमेनंतर प्रसिद्ध होणारी विधानसभा मतदारसंघनिहाय यादी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी तयार करण्यास राज्य निवडणूक आयोगास विनंती केली आहे.

यावरून जिल्ह्यातील सुमारे ७५४ ग्रामपंचायत निवडणुकीसाठी नवीन मतदार यादी वापरण्यात येण्याची दाट शक्यता आहे. या निर्णयामुळे मतदार यादीतील मयत, दुबार, स्थलांतरीत, तसेच बोगस मतदारांची नावे वगळून अद्ययावत होणारी मतदार यादीचा वापर होणार आहे. जिल्ह्यातील मुदत संपलेल्या, तसेच डिसेंबर २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ७५४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

या ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण यापूर्वीच जाहीर झाले असून, यंदा सरपंचपदाची थेट जनतेतून निवड होणार आहे. त्यानंतर सदस्यपद आरक्षण सोडतही जाहीर करण्यात आली आहे. आता प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे बाकी होते. त्याचा कार्यक्रमही जाहीर करून अंतिम मतदार यादी दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणार होती. मात्र, एसआयआर मोहीम सुरू असल्याने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी मतदार यादी प्रसिद्ध करण्यास मुदतवाढ देण्याची विनंती केली होती. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी प्रसिद्ध करण्यास स्थगिती दिली आहे.

एसआयआर मोहिमेमध्ये मतदार यादी अचूक होणार असून, बोगस, दुबार मतदारांची नावे वगळली जाणार आहेत. त्यानुसार केंद्रीय निवडणुक आयोगाकडून विधानसभा मतदारसंघनिहाय प्रारूप मतदार यादी दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी, तर अंतिम मतदार यादी दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणुका नोव्हेंबर किंवा डिसेंबर २०२६ मध्ये होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



### जिल्ह्यातील ७५४ ग्रामपंचायतींची निवडणूक

» जिल्ह्यात मुदत संपलेल्या आणि डिसेंबर २०२६ पर्यंत मुदत संपणाऱ्या सुमारे ७५४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. सरपंचपदाचे आरक्षण आणि सदस्यपदाच्या आरक्षणाची प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण झाली आहे. यंदाही सरपंचांची थेट जनतेतून निवड होणार आहे. मात्र अंतिम मतदार यादीला स्थगिती मिळाल्याने निवडणुकीचे पुढील वेळापत्रक बदलण्याची शक्यता आहे. अद्ययावत मतदार यादी तयार झाल्यानंतरच निवडणुकीच्या प्रक्रियेला वेग मिळणार आहे.

### एसआयआर मोहीम म्हणजे काय?

» एसआयआर (Special Intensive Revision) अर्थात मतदार यादी सखोल पुनरीक्षण मोहिमेचा उद्देश मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करणे हा आहे. या प्रक्रियेत मयत, दुबार, स्थलांतरित तसेच बोगस मतदारांची नावे वगळली जातात, तर पात्र नव्या मतदारांची नोंद केली जाते. यामुळे निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह बनण्यास मदत होते. राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकांसाठीही ही अद्ययावत मतदार यादी वापरण्याचा विचार असून, त्यामुळे मतदानातील त्रुटी कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पुढील वेळापत्रक कसे असेल?

» राज्य निवडणूक आयोगाने अंतिम ग्रामपंचायत मतदार यादी जाहीर करण्यास स्थगिती दिली असली, तरी एसआयआर मोहिमेनंतर विधानसभा मतदारसंघनिहाय मतदार यादीचा आधार घेत नवीन यादी तयार केली जाणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोग १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी, तर १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणार आहे. त्यानंतर ग्रामपंचायत निवडणुकांची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता असून, नोव्हेंबर किंवा डिसेंबर २०२६ मध्ये मतदान होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# बिगरमराठी रिक्षाचालकांना 'मराठी' शिकणे अनिवार्य! 'या' तारखेनंतर आरटीओची थेट कारवाई

## शहरातील प्रमुख रिक्षा संघटनांना आरटीओचे तातडीचे निर्देश; सर्व बिगरमराठी चालकांना प्रशिक्षणात उतरवण्याचे आवाहन.

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत (एसआयआर) सर्व मतदारांची नोंद मतदारयादीमध्ये व्हावी, यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्यामध्ये महायुतीनेच आघाडी घेतली आहे. प्रशासनाच्या सहकार्यासाठी महायुतीने १७ हजार, तर महाविकास आघाडीने ७,८८४ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची (बीएलए) नियुक्ती केली आहे. महायुतीमध्ये भाजपनेच नियुक्त केलेल्या 'बीएलए'ची संख्या सर्वाधिक ७,८०६ इतकी आहे.

'एसआयआर'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मतदारयादी त्रुटीमुक्त आणि अचूक तयार करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसार येत्या ८ ऑगस्टपर्यंत केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदार पडताळणी करणार आहेत. जिल्ह्यातील ९० लाख ८० हजार १७३ मतदारांच्या नोंदीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार असून, त्यासाठी जिल्ह्यात ८ हजार ४१७ मतदान केंद्रांवर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची (बीएलओ) नियुक्ती करण्यात आली असून, विविध राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची (बीएलए) नियुक्ती करण्याचे आवाहन निवडणूक विभागाकडून करण्यात आले आहे. मात्र, त्यामध्ये राजकीय पक्षांची उदासीनता जिल्हा प्रशासनाच्या निवडणूक शाखेकडील आकडेवारीवरून स्पष्ट झाली आहे.

राजकीय पक्षांकडून जिल्हा प्रशासनाला २४ हजार ८८४ 'बीएलए' देण्यात आले आहेत. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ७ हजार ८०६ जणांची नियुक्ती केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार) ५ हजार ६६७, तर शिवसेना (शिंदे) ३ हजार ५२७ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. महायुतीमधील या तिन्ही पक्षांनी मिळून १७ हजार नोंदणी केल्याचे दिसून येत आहे. तर महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून (शरद पवार) २ हजार ९५७, शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि काँग्रेसकडून अनुक्रमे २ हजार ४४५ आणि २ हजार १७३ जणांची नियुक्ती केली आहे. मनसेकडून अवघ्या ३२९ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे.



### १६ ऑगस्टपासून विशेष तपासणी

» प्रशिक्षणाची मुदत संपल्यानंतर १६ ऑगस्टपासून पुणे आरटीओ विशेष तपासणी मोहीम राबवणार आहे. तपासणीदरम्यान मराठी भाषा संवाद प्रशिक्षणाचे अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या बिगरमराठी रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. गंभीर प्रकरणांमध्ये वाहनचालकांचा परवानाही निलंबित केला जाऊ शकतो. नियमांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रवाशांना अधिक चांगली सेवा मिळावी आणि सार्वजनिक वाहतुकीतील संवाद अधिक सुलभ व्हावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.